मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## नव्या वर्षात नवे कारभारी!

### पाच वर्षांच्या प्रशासकराजानंतर मनपा निवडणुकीची आजपासून रणधुमाळी

**जालना । प्रतिनिधी -** मुंबईसह राज्यातील मुदत संपलेल्या २७ आणि नव्याने स्थापन झालेल्या जालना आणि इचलकरंजी मनपासाठी आजपासून (२३ डिसेंबर) रणधुमाळी सुरु होत आहे. राज्यातील सर्व मनपांसाठी एकत्रित मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे, तर मतमोजणी दुसऱ्याच दिवशी १६ जानेवारी रोजी होणार आहे. निवडणुकीसाठी अवघ्या २३ दिवसांचा अवधी असतांना अजूनही मनपा जागावाटपासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागावाटपावरून घोडं अडल्याचं चित्र जालना महानगर पालिका सह अवघ्या राज्यभरात आहे. मनपा निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. गेल्या पाच ते सहा वर्षांपासून सर्वच मनपांमध्ये प्रशासकराज सुरु असल्याने संपूर्ण व्यवस्था कोलमडली आहे. त्यामुळे आता मनपा नव्या वर्षात आता कारभाऱ्यांनी भरून जाणार आहेत.

राज्यात सर्वच मनपांसाठी आजपासून (२३ डिसेंबर) अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. ऑफलाईन नाम निर्देशन स्वीकारली जाणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी २३ ते ३१ डिसेंबर असणार आहे. सर्व दाखल उमेदवार अर्जांची छाननी दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ३१ डिसेंबर रोजी केली जाणार आहे. उम ेदवारी अर्ज माघार घेण्याचा दिवस १ जानेवारी २०२६ आहे. चिन्ह आणि अंतिम उमेदवार यादी ३ जानेवारी रोजी प्रसिद्ध केली जाईल. मतदान १५ जानेवारी रोजी होणार असून निकाल १६ जानेवारी रोजी असेल.

दरम्यान, मनपा निवडणुकीसाठी म हायुतीसह महाविकास आघाडीने सुद्धा कंबर कसली आहे. मुंबई, जालना महानगरसह राज्यात जवळपास सर्वच ठिकाणी शिंदेंची शिवसेना आणि भाजप एकत्रित लढतील असे चित्र निर्माण करण्यात आले आहे. मात्र, अधिकृतरित्या अद्यापपर्यंत जागा वाटपाचा फार्मुला ठरला नसल्याचे दिसून येत आहे. पुण्यात राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा सामना रंगण्याची शक्यता आहे. काँग्रेसला सोबत घेण्यासाठी अजित पवारांनी काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते सतेज पाटील यांना फोन केल्याची चर्चा आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक सहा मनपा असून याठिकाणी भाजप आणि शिंदे सेनेत युतीवरून अजूनही खणाखणी सुरु आहे. जालना महानगरपालिकेचा विचार करता भाजपा आणि शिंदेच्या शिवसेनेचे जागा वाटप ठरता ठरेना. भारतीय जनपा पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे एकला चलो रेच्या भुमिकेत असून नेत्यांनी महायुतीसाठी प्रयत्न सुरु ठेवलेले आहे. मात्र ५०-५० च्या फार्मुल्यावर शिंदेची शिवसेना अडून असल्याची चर्चा असल्याने जालना म हापालिकेत महायुतीची शक्यता धूसर होत चालली आहे. नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीत शिंदेंचा स्ट्राईक रेट तुलनेत सर्वाधिक राहिल्याने त्यांची जागावाटपात ताकद वाढली आहे. दरम्यान, मुंबई महानगरसह राज्यात जवळपास १० मनपांमध्ये ठाकरे बंधू एकत्र येण्यावर जवळपास शिक्कामोर्तब झालं आहे. दोन्ही पक्षांकडून उद्या (२३ डिसेंबर) घोषणा होण्याची शक्यता आहे. शिवसेना खासदा संजय राऊत यांनी यासंदर्भात संकेत दिले आहेत. मराठीबहुल वार्डात दोन्ही पक्षांमध्ये चढाओढ असल्याने राज ठाकरे यांनी संजय राऊत आणि अनिल परब यांना सबुरीचा सल्ला देत एक पाऊल मागे टाकलं आहे.

दरम्यान, नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत सत्ताधारी महायुती आघाडीने मोठा विजय मिळवला. २८८ जागांसाठी (२४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायती) युतीने २०७ जागा जिंकल्या. भाजप ११७ जागा जिंकून आघाडीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं ५३ जागा जिंकल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३७ जागा जिंकल्या.

महाविकास आघाडी ४४ जागांपर्यंत मर्यादित राहिली. काँग्रेसने २८ जागा जिंकल्या, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने फक्त ७ जागा जिंकल्या आणि शिवसेनेने (यूबीटी) ९ जागा जिंकल्या. इतरांनी ३२ जागा जिंकल्या आहेत.

## अकस्मात मृत्यूचा बनाव फसला; सागर धानुरे खूनप्रकरणी दोघे अटकेत

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** प्राथमिकदृष्ट्या अकस्मात मृत्यू म्हणून नोंदवण्यात आलेला सागर धानुरे यांचा मृत्यू अखेर पूर्वनियोजित खून असल्याचे उघडकीस आले असून, जालना जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. तांत्रिक विश्लेषण, गुप्त बातमीदारांची माहिती आणि कसून तपासाच्या जोरावर स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत हा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे.

दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी पोलीस ठाणे कदीम जालना येथे आ.मृ. नं. ५६/२०२५ अन्वये दाखल प्रकरणात मयत सागर धानुरे याने आत्महत्या केली नसून, त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत अजयकुमार बंसल, पोलीस अधीक्षक, जालना यांनी अज्ञात आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याचे स्पष्ट आदेश दिले.

तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपी कल्याण गणपतराव भोजने (वय ४१, रा. समर्थ नगर, जुना जालना) आणि मयत सागर धानुरे यांच्यात पैशाच्या देवाण-घेवाणीवरून दीर्घकाळ वाद सुरू होते. सागर धानुरे याच्या कथित तगाद्यामुळे त्रस्त झालेल्या कल्याण भोजने याने हा वाद कायम चा संपवण्याचा मार्ग निवडला. त्याला सागर धानुरे आणि कमलेश झाडीवाले यांच्यातही वारंवार वाद होत असल्याची माहिती होती. याच पार्श्वभूमीवर, दोघांनी मिळून सुमारे १५ दिवसांपूर्वी सागर धानुरेच्या खुनाचा थंड डोक्याने कट रचल्याचे उघड झाले.

या कटानुसार, कल्याण भोजने याने कम लेश झाडीवाले याला खून केल्यानंतर २५ लाख रुपये देण्याचे आमिष दाखवले होते. हा आर्थिक लालसेचा घटक या गुन्ह्याच्या मुळाशी असल्याचे तपासातून स्पष्ट होते.

दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ९ वाजता कल्याण भोजने याने सागर धानुरे याला जालना येथील एका हॉस्पिटलसम ोर बोलावून घेतले. त्याचवेळी त्याने कमलेश झाडीवाले याला याबाबत माहिती दिली. नियोजनानुसार कमलेश झाडीवाले कारमधून घटनास्थळी पोहोचला. सागर धानुरे याच्या शेजारी बसून त्याला संभाषणात गुंतवले आणि अचानक सोबत आणलेल्या गावठी पिस्टलमधून त्याच्या गळ्याजवळ दोन गोळ्या झाडल्या. प्रतिकाराच्या प्रयत्नात झटापट झाल्यानंतर, चाकूने छाती व गळ्याजवळ वार करून सागर धानुरे याची हत्या करण्यात आली. तो मयत झाल्याची खात्री करुन गाडी बाहेर पडला. त्याठिकाणाहुन आरोपी कम लेश झाडीवाले त्याच्या राहत्या घरी गेला. त्यानंतर दि.२१/१२/२०२५ रोजी सागर धानुरे यास पाहण्यासाठी पुन्हा घटनास्थळावर येवून छत्रपती संभाजीनगर येथे मयताच्या पोस्ट मार्टमसाठी मित्रांसोबत गेला.

सुरुवातीला प्रकरण अकस्मात मृत्यूचे वाटत असले, तरी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे तपासाची दिशा पूर्णतः बदलली. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांनी विशेष पथक तयार करून तपास सुरू केला. संशयाच्या भोवऱ्यात सापडलेल्या कल्याण भोजने याला ताब्यात घेतल्यानंतर, सखोल चौकशीत त्याने संपूर्ण कटाची कबुली दिली.

दरम्यान, मुख्य आरोपी कमलेश झाडीवाले याचा शोध घेण्यासाठी पथक छत्रपती संभाजीनगर येथे रवाना करण्यात आले. तो जालनाकडे येत असल्याची माहिती मिळताच नागेवाडी टोलनाक्याजवळ त्याला अडवून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यानेही गुन्ह्याची कबुली देत, २५ लाख रुपयांच्या मोबदल्याचे स्पष्ट केले.

हा गंभीर गुन्हा उघडकीस आणण्याची कारवाई आयुष नोपाणी, **पान २ वर**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५

## सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्यांतर्गत कार्यवाही

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन निवडणूकीच्या कालावधीमध्ये जिल्ह्यातील निवडणूक होणाऱ्या महापालिका क्षेत्रातील शासकीय, निम शासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपता करण्यास निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ साठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. त्यानुसार जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला आहे. काही व्यक्ती, संस्था यांच्याकडून मोठ्या प्रमाणात अनाधिकृत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती लावून शहरांचे विद्रुपीकरण करण्यात आले आहे. तसेच निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षांशी संबंधीत व्यक्ती, संस्था यांचेकडून होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्य निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपीत करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सुचित केल्यानुसार महापालिका क्षेत्रामध्ये निवडणूकीच्या कालावधीमध्ये होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती प्रदर्शीत करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी कालावधी संपल्यानंतर इमारती, मालमत्ता पुर्ववत करुन घेणे, जाहिराती तात्काळ काढून घेणे आवश्यक आहे. असेही आदेशात नमुद आहे.

युवा आदर्श

### स्वायत्त ...

लोकशाही महत्वाची
संस्था हव्या स्वायत्त
कारभार चालो मुक्त
निर्णय सर्व अनायत्त
पायमल्ली नकोमुळी
अधिकार होआश्वस्त
ढवळा ढवळ नसावी
नकोकुणा अधिनस्थ
उचित हवा हस्तक्षेप
नको संहिता उध्वस्त
संतुलित हवीयं वृत्ती
जसे तौलनिक त्रयस्थ
हक्क किल्ले भक्कम
असावी संरक्षित गस्त
कायद्याची तोड फोड
अलिकडे वाढते प्रस्थ
गरजेनुरूप नियमामधे
वेळोवेळी करी दुरुस्त
हस्तक्षेप वर्जित नीत
कार्य चालावे रे उपात्त
नेमा निस्पृह कर्मचारी
कर्मयोगी ते सावचित्त
नियमात रे प्रतिबंधित
राहो कायम एकश्चित्त
वेळी कडक कारवाई
शैथिल्यातून परावृत्त
जबाबदारीने वागावे
अफवेस नको निमित्त

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### स्टेअर्स युथ गेम्सतर्फे जालना जिल्हा निवड चाचणी यशस्वी

## जालना जिल्हा कराटेपटू राज्यस्तरासाठी सज्ज

**जालना । प्रतिनिधी -** स्टेअर्स युथ गेम्स तर्फे आयोजित विरार, मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी जालना जिल्हा निवड चाचणी स्पर्धा अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. ही स्पर्धा रविवार (दिनांक २१ डिसेंबर) रोजी जालना येथील श्री. म. स्था. जैन प्राथमिक विद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आली होती. या निवड चाचणीतून निवड झालेले खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या निवड चाचणीच्या अध्यक्षस्थानी स्टेअर्स चे जालना जिल्हाध्यक्ष तथा 'दैनिक युवा आदर्श'चे संपादक दीपक शेळके होते. प्रमुख पाहुणे म्हणून आशिष उपाध्याय, गणेश श्रीराम आणि प्रशांत पेम्बर्ती उपस्थित होते. तसेच स्टेअर्स डिस्ट्रिक्ट गेम्सचे चीफ को-ऑर्डिनेटर सेन्साई रुपेन्द्र पारचा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

निवड चाचणी दरम्यान काता व कुमिते या दोन्ही प्रकारांमध्ये मुली व मुलांनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवले. विजयी खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. यामध्ये गोल्ड, सिल्वर आणि ब्रॉन्झ मेडल मिळवणाऱ्या खेळाडूंनी आपल्या कठोर सरावाचे फळ मिळवले. या प्रकारच्या जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धा ग्रामीण व शहरी भागातील होतकरू खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देतात. लहान वयात स्पर्धात्मक अनुभव मिळाल्याने खेळाडूंचा आत्मविश्वास वाढतो, शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक कणखरपणा निर्माण होतो. कराटेसारख्या खेळातून शिस्त, संयम, आत्मसंरक्षण आणि नेतृत्वगुण विकसित होतात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात.

**यशस्वी झालेले कराटे खेळाडू** काता मुली व मुले ( गोल्ड मेडल) कु. रावी वल्लाकट्टी, कु. निवांशी वल्लकट्टी, कु. आराध्या खत्ती, कु. दिव्यता कोठारी, कु. लावण्या गुडला, कु.अश्विनी आजगे, कार्तिक जांगिड, ऋषिकेश श्रीराम, सम र्थ डहाळे, यशवर्धन चिल्का, शेलमॉन गुडेकर, अमन पारचा.

काता मुली व मुले( सिल्वर मेडल) कु. समृद्धी भालमोडे, कु. ध्रुवीमुथा, कु. आस्था अवधूत, कु. तन्वी खरटमल, कु. वैष्णवी लोखंडे, कु. आकाशी खर्डेकर, कुशल वलकट्टी, रुद्र लुटे, सम्यक भालमोडे, मोहन झुंझुर, नयन गोमतीवाले.

काता मुली व मुले (ब्रांस मॅडल) कु. इच्छा अवधूत, कु. स्नेहा काळुंके, कु. स्वरा वल्लाकट्टी, कु. अनुष्का म्हेत्रे, कु. तृप्ती उपरे, कु. वैष्णवी लुटे, कु. आकांक्षा चिल्का, कु. पूर्वा माने, आकांक्षा चिल्का, र्ज्ञी. वैष्णवी लुटे, कु. दिव्यता, कु. लावण्या गुडला, पूर्वा माने, कु.अश्विनी आजगेख, कार्तिक जांगिड, अद्वय खरटमल, ऋषिकेश श्रीराम, रुद्र लुटे, समर्थ डहाळे, सम्यक भालमोडे , ईशांत रीडलॉन, मोहन झुंझुर, आदर्श गायकवाड, अजित साळवी, डलॉन यशवर्धन चिल्का, कुमिते मुली व मुले (ब्रांस मेडल) कु. रवी वल्लाकट्टी, कु. समृद्धी भालमोडे, आदित्य गायकवाड.

या खेळाडूंना सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा व सेन्साई अमन रुपेन्द्र पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पंच म्हणून सेन्पाई अश्विनी आजगे, सेन्पाई लावण्या गुडला आणि सेन्पाई पूर्वा




अद्वय खरटमल, ईशांत रीडलॉन, देवेंद्र चिंचपुरे, अजित साळवी.

कुमिते मुली व मुले (गोल्ड मेडल) कु. स्नेहा काळुंके, कु. ध्रुवी मुथा, कु. निवांशी वलकट्टी, कु. स्वरा वल्लाकट्टी, आराध्या खत्ती, कु. तन्वी खरटमल, कु. आरुषी वलकट्टी, कु. अनुष्का म्हेत्र, प्रणव अडिगोपूल, नयन गोमती वाले, शेलमॉन गुडेकर, अमन पारचा.

कुमिते मुली व मुले (सिल्वर मेडल) कु. इच्छा अवधूत, कु. आस्था अवधूत, कु. तृप्ती उपरे, वैष्णवी लोखंडे, कु. आकाशी खर्डेकर, कुशल वलकट्टी, देवेंद्र चिंचपुरे.

माने यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कु. अश्विनी आजगे हिने केले. स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या खेळाडूंचे महावीर ढक्का, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, तसेच विविध शाळांचे मुख्याध्यापक, **पान २ वर**

संपादकीय पान

# आर्थिक उदारीकरणाचे जनक

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीम नगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरोमनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## पान १ वरुन

### जालना जिल्हा ...

शिक्षकवर्ग, मान्यवर व पालकांनी मनापासून कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

एकंदरीत, ही निवड चाचणी स्पर्धा जालना जिल्ह्यातील क्रीडासंस्कृती मजबूत करणारी ठरली असून, राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्याची क्षमता या खेळाडूंमध्ये नक्कीच आहे.

### अकस्मात मृत्यूचा ...

अपर पोलीस अधीक्षक, आणि अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी दाखवलेली सतर्कता आणि समन्वयामुळे हा गुन्हा वेळेत उघड झाला.

या प्रकरणातून पैशाच्या वादातून होणाऱ्या गुन्ह्यांची वाढती तीव्रता, तसेच अकस्मात मृत्यू म्हणून भासवले जाणारे गंभीर गुन्हे कसे उघडकीस येऊ शकतात, हे स्पष्ट होते. पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप करून समाजात सुरक्षिततेचा संदेश दिला आहे. मात्र, आर्थिक वाद, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि शस्त्रसाठा यावर कठोर नियंत्रणाची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

सध्या दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी कदीम जालना पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, या प्रकरणातील आणखी कोणते धागेदोरे समोर येतात का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# सुजाण - सजग ग्राहक व्हा..!

कस्टमर ईज किंग (ग्राहक राजा आहे.),किंवा कस्टमर ईज गॉड. (ग्राहक देवआहे) अशी विशेषण ग्राहकाला लावली जातात.आणि दुसरीकडे अनेक प्रलोभन दाखवून ग्राहकांना आपल्या मालाचे,वस्तूंच्या खपासाठी आकर्षित केले जाते,आणि जाळ्यात ओढले जाते.आणि बऱ्याचदा अशा प्रलोभनांना ग्राहक बळी पडतो. त्यातच त्याची फसवणूक केली जाते. पॅन्ट वर शर्ट मिळणार अगदी फुकट .साडीवर साडी मिळणार अगदी फुकट.बाय वन गेट वन,एक वस्तू खरेदी केली तर एक फुकट,तर कधी विशिष्ट रकमेचा माल खरेदी केला तर कुपन मिळेल, त्याची सोडत निघणार त्यात हमखास बक्षिस मिळणारच. सोने खरेदीवर चांदीचे नाणे,किंवा गिफ्ट मिळणार, फ्लॅट खरेदीवर टू व्हीलर मिळवा,अश्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर केल्या जातात आणि त्यालाच तुम्ही आम्ही भुलतो,आणि फसवणूक होते.

आज आपण बाजारपेठेत नजर टाकली तर जिकडे तिकडे आपल्याला मालाच्या जाहिरातीच जाहिराती बघायला मिळतात. कुठे मोठ्या प्रमाणावर अनेक वस्तूंचा सेल लागलेला असतो आणि त्यासोबत बक्षिसेही दिली जातात. एकूणच सध्याचा काळ हा स्पर्धेचा आहे, तसा जाहिरातीचाही आहे. जो तोआपला उत्पादित माल बाजार पेठेत कसा जास्त विक्री होईल या प्रयत्नात असतो. वर्तमानपत्राची बरीच पाने जाहिरातीने व्यापलेली असतात.

ग्राहक दिन साजरा करण्या मागचा उद्देश बघितला तर ग्राहकाची फसवणूक होवू नये,सेवा पुरवताना हलगर्जीपणा होवू नये म्हणून ग्राहकाला ग्राहक कायद्याची माहीती करुन द्यावी हाच मुळ उद्देश आहे.

१९६० मध्ये अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीत ग्राहक चळवळीचा मुद्दा उपस्थित झाला होता.अध्यक्ष केनेडी यांनी ग्राहकांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी एक व्यासपीठ तयार केल.जागतिक पातळीवर पाठपुरावा केला गेला,त्याला युनेस्को कडून मान्यता मिळाली.आणि तदनंतर दरवर्षी १५ मार्च हा दिवस, जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे.सर्वत्र तो साजरा केला जातो.

आपल्या देशात २४ डिसेंबर १९८६ मध्ये राष्ट्रपतींनी ग्राहक हक्क संरक्षण कायद्याला मंजुरी दिली.तेव्हा पासून ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. व २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकास सहा प्रकारचे हक्क प्राप्त झाले आहेत. प्रत्येक ग्राहकास आपले हक्क माहीत असतील तर त्याची फसवणूक होणार नाही.

काय आहे हे हक्क?

१) सुरक्षेचा हक्कः- एखादी वस्तू खरेदी करतो,तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची हमी उत्पादकानी घेणे आवश्यक असते.जसे फ्रीज.टी.व्ही. वॉशिंग मशिन.मोटर बाईक,कार, फ्लॅट, कुठल्याही वस्तू.

२) माहितीचा हक्कः-आपण खरेदी करत असलेल्या वस्तूंच्या गुणवत्ते बद्दल माहिती विक्रेत्याने ग्रहकांना देणे बंधनकारक आहे.त्यात फसवणूक करु नये.

३) निवड करण्याचा हक्कः-विक्रेता एकाच प्रकारचे उत्पादन, वा ब्रॅन्डचा आग्रह करु शकत नाही.निवडीचा अधिकार ग्राहकांना आहे.

४) म्हणणं मांडण्याचा हक्कः - ग्राहकाला आपली फसवणूक झाली वाटत असेल तर आपले म्हणणे,योग्य न्यायासाठी मांडण्याचा हक्क आहे.



५) तक्रार करण्याचा, तसेच तिचे निवारण्यासाठीचा हक्कः- फसवणूक झाली असेल तर,न्यायासाठी तक्रार निवारण करुन घेण्यासाठी ग्राहक मंच,राज्य ग्राहक परिषदेत जाण्याचा हक्क आहे.

६) ग्राहकांचे हक्का विषयी शिक्षणाचा अधिकार. हक्कः- ग्राहकांना हक्क कर्तव्ये माहिती नसल्यामुळे बाजारपेठेत फसवणूक होते,ते समजण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासनाचे कडून जागो ग्राहक जागो सारखे उपक्रमा द्वारे प्रबोधन केले जाते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वैद्यकीय सेवा या सेवेच्या व्याख्येत येतात आणि डॉक्टरांना ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत जबाबदार धरले जाऊ शकते.

सुधारित ग्राहक संरक्षण विधेयक ३० जुलै २०१९ लोकसभेत व सहा ऑगस्ट २०१९ राज्यसभेत मंजूर झाले.

९ ऑगस्ट रोजी राष्ट्रपतींची सही झाल्यावर २० जुलै रोजी ते लागू झाले, आता जिल्हा आयोग व राज्य आयोग अशी रचना आहे. जिल्ह्यात एक कोटी पर्यंत, राज्य दहा कोटी पर्यंत, व त्यावरील केंद्रीय आयोगाकडे दावे असतील. नवीन कायद्यात ऑनलाइन व टेलीशॉपिंग कंपन्यांचा समावेश आहे. खाद्यपदार्थ व पेय यात भेसळ असल्यास तुरुंगवास दंडाची तरतूद आहे. तक्रार कुठेही दाखल करता येते. दिशाभूल करणाऱ्या चुकीच्या जाहिराती देणारे आणि प्रसारीत करणाऱ्यांना दंड करण्याचा आयोगाला अधिकार आहे. दोन वर्षे तुरुंगवास व पन्नास लाख दंडाची तरतूद आहे.

ग्राहकांची फसवणूक झाली असेल तर त्याला न्याय हा मिळतोच, पण आपल्या हक्का सोबतच काही कर्तव्ये आहेत याची जाणीव सुद्धा ग्राहकांनी ठेवायला हवी.

काय आहे ती कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या?

कर्तव्ये आणि जबाबदारी

षबाजारपेठेत एका उत्पादनासाठी अनेक उत्पादक असतात.त्यात स्पर्धा ही असणारच. फसव्या जाहिरातीला ग्राहकाने बळी पडू नये.

षबऱ्याचदा धमाका सेल ऑनलाईन खरेदीवर असतात,सणवारालाही डिस्काउंट सेल असतात,अशा वेळी न खपलेला,किंवा काही दोष असलेला माल असू शकतो.सावधपणे खरेदी करावी.

षखरेदी करतांना मालाचे बिल आवश्यक आहे.बिलाचा आग्रह धरावा.न दिल्यास विक्रेत्याची तक्रार करावी.कारण माल दोषयुक्त असेल तर बिलाशिवाय आपण काहीच करु शकत नाही.

षएम.आर.पी.(मॅक्झीमम रिटेल प्राईज) पेक्षा जास्त किंमत देऊ नका. खरेदी करतांना ती बघा.

षवस्तूंची मुदत तपासा. (एक्सपायरी डेट) ती संपली असेल तर वस्तू नाकारावी.अशा वस्तूचा वापर हानिकारक ठरु शकतो.

षपेट्रोल भरतांना मीटरवर शून्या कडे लक्ष द्या.शुध्दते विषयी शंका असल्यास पुरवठा निरीक्षक,तहसीलदार यांचेकडे तक्रार करा.

षसोने खरेदी वेळी हॉलमार्क कडे लक्ष द्या.

षऑनलाईन खाद्य पदार्थ मागवताना योग्य काळजी घ्या.पदार्थ खराब आढळून आल्यास ताबडतोब तक्रार करावी.

ग्राहकांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहकआयोग व राज्य पातळीवर राज्य ग्राहक आयोग कार्यरत आहेत. विनाशुल्क आपण तक्रार दाखल करु शकतो. केंन्द्रात राष्ट्रीय ग्राहक आयोग आहे. तर राज्यातील दुर्गम भागात ग्राहक उपाययोजनांसाठी ग्राहक कल्याण सल्लागार समिती आहे. याव्यतिरिक्त जागो ग्राहक जागो व कंझुमर क्लब आहेत.

गावपातळीवर ग्राहकांसाठी ग्राहक सेवा संस्था, ग्राहक पंचायत,प्रवासी संघ,कार्यान्वित आहेत.ग्राहकांवर अन्याय होऊ नये म्हणून त्या कार्य करतात.प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समिती आहे.या समितीत विविध विभागातील सदस्यांची निवड केली जाते.शासकिय सदस्य + अशासकिय सदस्य असतात.

काही वर्षांपासून शासनात ग्राहक संरक्षण विभागाची निर्मिती केली आहे.त्यासाठी स्वतंत्रपणे मंत्र्याची नेमणूक केली जाते.

शहरी,ग्रामीण भागात ग्राहकाचे हक्का रक्षण होणे त्याला न्याय मिळवून देण्यासाठी व्यवस्था असली तरी

ग्राहकास खूप काळ न्यायासाठी ताटकळत बसावे लागते.अनेक ठिकाणी जिल्हा ग्रा.मंचावर अध्यक्ष नसतात.त्यांच्या नेमणूका लवकर होत नाही, तर कधी मंचाचे सदस्य नसतात. नव्वद दिवसांत न्याय मिळण्याचा हेतू साध्य होत नाही.शासनाचे दुर्लक्षच म्हणावे लागेल.

ग्राहकांच्या वाढत्या फसवणूकिचे प्रकाराला आळा बसावा म्हणून केंन्द्र सरकारने जागो ग्राहक जागोअभियान सुरु केले आहे.बँका,सार्वजनिक वितरण, वीज,बांधकाम, अन्नौषध, पर्यटन, पोस्ट,अशा विविध प्रकारच्या खात्याच्या तक्रारी ह्या अभियानाच्या हेल्पलाइन(मदत सेवा प्रणाली) वर ग्राहक करु शकतो.

जागतिक ग्राहक दिन,राष्ट्रीय ग्राहक दिनाचे शासकिय पातळीवरून आयोजन केले जाते. त्यात औपचारिकता असते.काहीच ठिकाणचे अपवाद सोडले तर बहुतांशी उदासीनता असते.कार्यक्रमा संबंधित प्रसार, प्रचार व्हावा तो होत नाही. ठरावीकच लोकांना पत्रिका वाटून कार्यक्रम होतात. ज्यांना पत्रिका जातात ते कोणिही कार्यक्रमात नसतात.ही सत्यता आहे.कार्यक्रमास ग्राहकांची उपस्थिती चा अभाव असतो. बऱ्याचदा तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी, वेंडर, स्वस्तधान्य दुकानदार हेच उपस्थित असतात.दहापंधरा लोकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उरकून घेतला जातो. फोटो प्रसिद्ध होतात. आत्मियतेने आयोजन अपेक्षित आहे ते केले जात नाही.

वास्तविक अशा कार्यक्रमात, वेगवेगळ्या खात्याचे अधिकारी, गॅस एजन्सी, वजनमापांबाबत अधिकारी उपस्थिती हवी.ग्राहकांना ग्राहक संरक्षण कायदा समजवून सांगायला हवा ते होत नाही.कार्यक्रमात ग्राहकांची उपस्थिती वाढणे साठी प्रयत्न होत नाही.सालाबाद प्रमाणे कार्यक्रम साजरा करुन, वर्तमानपत्रात वृत्त प्रसिद्ध होते.यापलीकडे काही साध्य होत नाही.ते आपण दरवर्षी पहातोच. कार्यक्रम त्यांच्या पद्धतीने साजरे होतात. वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळते, त्यावर प्रतिक्रिया येतात, जैसे थे सुधारणा मात्र नाही.

शासनाने या बाबतीत योग्य ती दखल घेणे आवश्यक आहे. व त्यात सुधारणा घडवून आणायला हवी हे मात्र नक्कीच. शेवटी एकच म्हणावे लागेल. कायद्याने ग्राहकांना हक्क, अधिकार दिले आहेत.ग्राहक म्हणून त्याचा कसा वापर करायचा ते आपणच ठरवायचे आहे.कारण...ग्राहक शक्ति + न्याय शक्ति + दंड शक्ती = शोषण मुक्ती हेच समीकरण आहे.न्याय मिळवण्यासाठी न घाबरता तक्रार करायलाच हवी.

ग्राहकाने त्यास दिलेल्या हक्काचा योग्य वापर करुन, आपली कर्तव्ये लक्षात ठेवून बाजारपेठेत जागृत राहून खरेदी करणेही अपेक्षित आहे,जेणे करुन तो फसवणुकीतून वाचू शकेल.

थोडक्यात राष्ट्रीय ग्राहक दिन,जागतिक ग्राहक दिन केवळ औपचारिकरित्या साजरे करून चालणार नाही, तर व्यापक प्रमाणावर ग्राहकचळवळ उभी राहाणे आवश्यक आहे.

**दिलीप देशपांडे, जामनेर.**
**जि.जळगांव**
**मोबा.८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

# वृक्षतोड केली तर मानवी जीवन धोक्यात असेल...

एकेकाळी पृथ्वीतलावर झाडांची संख्या अमाप होती. प्रत्येक जण झाडे लावून झाडांना जीवापाड जपायचा आणि पर्यावरणाचे महत्त्व जाणून शेतात, रस्त्याच्या कडेला व रस्त्याच्या दुतर्फा, मोकळ्या रानात आणि बांधावर झाडे लावून त्या झाडांचे रूपांतर मोठ्या वृक्षात होईपर्यंत त्याची योग्य देखभाल करायचा. पूर्वीच्या लोकांना झाडे तोडायचे म्हटले तर नको वाटायचे. विशेष म्हणजे जर एखाद्या माणसाने झाडे लावून त्या झाडांचे रूपांतर मोठ्या वृक्षात होईपर्यंत त्याचे संगोपन केले आणि त्या झाडांना जर यदाकदाचित तोडायची वेळच आली, तर त्या झाडांना मोठे करणाऱ्या व्यक्तीच्या डोळ्यातून अश्रू वाहायचे. आपण स्वतःहून लावलेली झाडे आपोआप वाळून गेली तर माणसाच्या मनाला खूप खूप वेदना व्हायच्या आणि डोळ्यातून पाणी वाहायचे. सध्या पृथ्वीतलावर झाडांची संख्या दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे. एकेकाळी पृथ्वीतलावर झाडे, झुडपे, लता आणि वेली यांनी निसर्गाची शोभा वाढवली होती. जिकडे बघावे तिकडे निसर्गाचे हिरवेगार व लाजवाब सौंदर्य पाहून माणसाचे मन मोहून जायचे. सगळा शेत शिवार हिरवळीने नटलेला आणि फळाफुलांनी बहरलेला दिसायचा. तेव्हा सगळीकडे दाट जंगल व झाडी असायची. प्रत्येक जण उन्हाळ्याच्या दिवसात झाडांच्या सावलीची मजा लुटायचा. उन्हाळ्याच्या दिवसात आपल्याला झाडांचे महत्त्व कळते. गावावर दुष्काळ पडल्यावर आणि पाण्यासाठी वणवण भटकावे लागल्यावर आपल्या जीवनात झाडांचे महत्व किती असते? ते आपल्याला कळते. सध्या पृथ्वीतलावर झाडांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. म्हणून आजचा माणूस निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. कारण लोकसंख्या वाढत गेल्यामुळे आणि लोकांना राहण्यासाठी प्लॉटिंग कमी पडत असल्यामुळे माणसाने जंगल तोड करून वृक्षांचे प्रमाण खूप कमी केले आहे. म्हणून सध्या महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. पाऊस एकतर वेळेवर पडत नाही आणि पडलाच तर थेट अतिवृष्टी करून टाकतो. शेतकऱ्यांच्या नशिबी कायम दुष्काळ असतो. पाऊस अति पडला तर अतिवृष्टी होते आणि पाऊस कमी पडला तर कोरडा दुष्काळ पडत. शेतकरी नेहमी दुहेरी संकटात अडकतो. याला कारणीभूत आपणच आहोत कारण आपण आपल्या स्वार्थासाठी वृक्षांची कत्तल करून मोकळे होतो. परंतु याचा परिणाम मानवी जीवनावर कसा होतो? याचा आपण तीळमात्र देखील विचार करत नाही. याचा परिणाम म्हणजे, पाऊस कधी वेळेवर पडतो तर कधी वेळेवर सुद्धा पडत नाही. हल्ली जंगलाचे प्रमाण घटत चालल्यामुळे व वृक्षतोड वाढत चालल्यामुळे माणसाला शुद्ध हवा घेणे दुरापास्त झाले आहे. असेच लोक मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करू लागले, आणि जंगलातील झाडांचा सुपडा साफ करू लागले, तर एक दिवस झाडांचे प्रमाण अतिशय कमी होईल आणि याचा परिणाम म्हणून माणसाला विविध आजार जडण्याची शक्यता टाळता येणार नाही. हल्ली माणसे आजारी पडण्याला कारणीभूत आपल्या आसपासचा निसर्ग परिसर आहे. कारण आपल्या आसपास झाडांची संख्या म्हणावी तेवढी नसल्यामुळे माणसाला शुद्ध हवा मिळणे कठीण झाले आहे. म्हणून लहान मुले व मोठी माणसे आजारी पडत आहेत.कारण त्यामुळेच माणसाच्या आरोग्याला मोठा धोका पोहोचत आहे. मित्रांनो एक दिवस असा येईल की, पृथ्वीवरील जास्तीत जास्त झाडे नष्ट होऊन पृथ्वी उजाड, ओसाड आणि भकास दिसणार आहे. हिरवळीने नटलेल्या पृथ्वीचे लाजवाब सौंदर्य लुप्त होऊन याचा भयंकर परिणाम माणसाच्या आरोग्यावर होणार आहे. कारण माणसांना चुलीवर स्वयंपाक करण्यासाठी जळण फाटा आणावा लागतो. झाडांच्या लाकडापासून विविध अवजारे बनवले जात आहेत. वृक्षतोड करून झाडांच्या चोत्यापासून कागद बनवला जातो. झाडांचे आपल्या जीवनात खूप महत्त्व आहे. झाडाचा आणि माणसाचा संबंध कधीही न तुटणारा अविभाज्य घटक आहे. झाडांपासून आपल्याला सावली मिळते, झाडांपासून आपल्याला फुले व फळे मिळतात. उन्हाळ्यात उन्हाच्या झळा बसू लागल्या की, झाडांची आठवण हमखास येते. उन्हाळ्यात झाडांशिवाय माणसाला पर्याय नाही. माणसाने झाडांपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात अमुलाग्र असा बदल करून घ्यावा. झाडे थंडी म्हणत नाहीत, पाऊस म्हणत नाहीत, ना ऊन म्हणत नाहीत. ते सातत्याने अंगावर उन्हाच्या, थंडीच्या व पावसाच्या धारा सोसून न डगमगता, कितीही तुफानी वादळवारा येऊ द्या आणि ऊन, वारा, थंडी, पाऊस लागू द्या, झाड मोठ्या हिंमतीने आलेल्या संकटावर मात करून मोठ्या ऐटीत व दिमाखात उभे राहते. शासन दरवर्षी रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागेत, शाळेच्या व्हरांड्यात, शेत शिवारात आणि जिथे झाडांचे प्रमाण कमी आहे, अशा ठिकाणी झाडे लावून शासन मोकळे होते. झाडे लावताना झाडांसोबत फोटो काढायचे आणि ते फोटो सोशल मीडियावर व्हायरल करायचे. एकदा फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केले की, मग नंतर त्या झाडांकडे ढुंकूनही बघायचे नाही. झाडे मेलीत का जिवंत आहेत? हे देखील कोणी बघायला तयार नसतो. परिणामी ती झाडे वाळून जातात परंतु शासनाच्या दरवर्षीच्या झाडे लावा झाडे जगवा या उपक्रमाची कोणीच गांभीर्याने दखल घेत नाही. हीच खरी शोकांतिका आहे. पेपरबाजी करून प्रसिद्धी मिळवण्यापेक्षा, झाडे लावून त्याचे योग्य संगोपन केले तर मित्रांनो आपल्याला पेपर बाजीची गरज नाही. ना फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल करत बसायची गरज नाही, फक्त गरज आहे ती रोज नित्यनेमाने झाडांना पाणी घालून झाडांचे संगोपन करण्याची आणि छोट्या झाडांचे मोठ्या झाडात रूपांतर करण्याची. मित्रांनो आपल्याला झाडांकडून खूप काही शिकता येते. झाडे स्वतः झिजून म्हणजेच ऊन, वारा, पाऊस, गारा खाऊन कोणतीच अपेक्षा न ठेवता निस्वार्थ भावनेने आपल्याला सावली देतात, उन्हाळ्यात आपल्याला सावलीची नितांत गरज असते आणि तेव्हा आपल्याला झाडांचे महत्त्व कळते. लोकसंख्या वाढत गेली आणि लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडू लागली तर प्लॉटिंग पाडली जाते, त्यासाठी जंगलातील झाडे तोडून तिथे मोठमोठ्या इमारती उभ्या केल्या जात आहेत. लोकसंख्या अशीच वाढू लागली आणि एक दिवस संपूर्ण जंगल नष्ट झाले आणि शेत शिवारातील झाडे कमी झाली तर मग निसर्गचक्र कुचकामी ठरणार आहे. आणि जिकडे झाडांचे प्रमाण कमी आहे, तिकडे पाऊस असाच दगा देणार आहे. त्यासाठी बांधवांनो झाडे तोडणे म्हणजे स्वतःच्या हाताने स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतल्यासारखे आहे. वृक्षतोडीचे विपरीत परिणाम आपल्याला नक्कीच भोगावे लागतील. आपले शरीर व आरोग्य चांगले व मजबूत राहावे वाटत असेल, स्वच्छ व शुद्ध ऑक्सिजन मिळावा असे वाटत असेल, भरपूर पाऊस आपल्याकडे पडावा असे वाटत असेल आणि आपल्याला उन्हाळ्यात झाडांची सावली हवी वाटत असेल तर आपल्याला वृक्षतोड थांबवावी लागेल, नवीन वृक्षांची लागवड करून वृक्ष संगोपन करावे लागेल. त्यासाठी समस्त भारतीयांनी झाडे लावण्याचा विचार करावा. प्रत्येकाने किमान दोन तरी झाडे लावून ती झाडे मोठे होईपर्यंत त्या झाडांचे योग्य पालन पोषण केले तर झाडे आपल्याला कधीच दगा देणार नाहीत. झाडावर कुऱ्हाडीचे घाव जरी घातले तरी झाड न डगमगता व न सुकून जाता ते आपल्याला फुले, फळे व सावली देतच राहते. झाडे एक निस्वार्थ सजीव प्राणी आहेत. ते कोणाकडून कोणतीच अपेक्षा ठेवत नाहीत. म्हणून शेतकऱ्यांना विनंती आहे की, भावांनो पाऊस न पडण्याचे एकमेव कारण आपण स्वतः आहोत, आपण हिरवळीने नटलेला शेत शिवार झाडे तोडून भकास व उजाड करून टाकला आहे. त्यासाठी मित्रांनो आपण पर्यावरणाचे महत्त्व ओळखावे. वृक्षांची प्रेरणा घेऊन आपण जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणावा... त्यासाठी बांधवांनो वृक्षतोड थांबवा आणि जीवन लांबवा...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# जालना महानगरपालिका निवडणुकीसाठी रावसाहेब दानवे यांची निवडणूक प्रभारीपदी नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने जालना महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे यांची जालना महानगरपालिका निवडणुकीकरिता निवडणूक प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीबाबत भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांनी अधिकृत पत्राद्वारे माहिती दिली आहे. पत्रात नमूद करण्यात आले आहे की, संघटन कौशल्य, निवडणूक व्यवस्थापनाचा अनुभव आणि कार्यकर्त्यांशी असलेली मजबूत नाळ लक्षात घेता ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रात सांगितले की, रावसाहेब पाटील दानवे हे आपल्या संघटन कौशल्याच्या जोरावर भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन अथक परिश्रम करतील. त्यांच्या नेतृत्वाखाली जालना महानगरपालिकेत भाजप अधिक बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.



दरम्यान, या महत्त्वपूर्ण जबाबदारीबद्दल रावसाहेब पाटील दानवे यांचे भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून अभिनंदन होत असून, जालना शहरात भाजपच्या विजयासाठी सर्व शक्तीनिशी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे.

# दादरमध्ये शिवोत्सवाचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी -** श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादर पश्चिम येथील धुरू हॉल मध्ये रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ५ ते ८.३० पर्यंत शिवोत्सव - २०२६ आयोजित करण्यात आला आहे. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय महाराष्ट्र राज्याचे संचालक डॉ तेजस गर्गे हे जागतिक वारसा स्थळे १२ किल्ले जबाबदारी : सरकारची आणि आपली या विषयावर तर शंभू व्याख्याते अक्षय चंदेल यांचे मला समजलेले छत्रपती संभाजी महाराज या विषयावर व्याख्यान होणार आहे. ज्येष्ठ इतिहास संकलक लेखक दुर्गमहर्षी आप्पा परब यांना जीवन गौरव सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शिवदुर्ग मित्र (लोणावळा),डेला ऍडव्हेंचर (लोणावळा ), यशवंती हायकर्स (खोपोली ), निसर्ग मित्र (पनवेल ), नासिक क्लाइंबर्स अँड रेस्क्यूअर्स असोसिएशन (छ्उठ) या रेस्क्यू संस्थांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मोडी लिपी निबंध स्पर्धा, शिवबावनी कथन स्पर्धा, गडकिल्ले छायाचित्रण स्पर्धा यांचा पारितोषिक वितरण समारंभ सुद्धा यावेळी होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून शिवप्रेमी आणि इतिहासाच्या अभ्यासकांनी या कार्यक्रमास अगत्याने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे प्रमुख डॉ.हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे.

# कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालय व रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी केली बक्षिसांची लय लूट



**विशाल देशमुख**

**टेभूर्णी -** कै.बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी १०० शिक्षक क्लब ऑफ जालना आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड किल्ल्यांवर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेमध्ये श्रावणी पुंड ( वर्ग दहावा),कुणाल शहाणे ( वर्ग दहावा) ,स्नेहल काजळकर ( वर्ग दहावा),श्रद्धा साहू ( वर्ग नववा) ,अदिती राय वर्ग ९ तसेच रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालयातील श्रेया अनिल मालसमिंदर ,श्रुती ऋषी खांडेभराड ,साधना केदार लाड, नियती नीरज राय यांनी विद्यालयातून प्रथम द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक पटकावल्याबद्दल हिंदू समाज संस्थेचे अध्यक्ष ड.संजीव देशपांडे, उपाध्यक्ष जगदीश बडवे ,सचिव चंद्रशेखर वाघमारे, संचालक डॉ. विनायक दसरे, कुमार देशपांडे, रावसाहेब अवघड, नितीन कोळेश्वर, शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी कुलकर्णी व मनीषा देव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन उपक्रमशील शिक्षक संदीप इंगोले, पवन कुलकर्णी, अनघा जोशी यांनी केले.

# निसर्ग सहल व परिक्षेत्र भेट विद्यार्थ्यांसाठी ठरली चैतन्य व प्रेरणा देणारी - जगत घुगे

**जालना । प्रतिनिधी -** जि. प. प्राथमिक शाळा राजेवाडी येथील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली निसर्ग सहल व परिक्षेत्र भेट ही केवळ फेरफटका न राहता विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना देणारी, चैतन्य व प्रेरणा निर्माण करणारी ठरली. राजेवाडी येथील सत्संग डेरा परिसरात तसेच आसपासच्या विविध उद्योग-आस्थापनांना शाळेच्यावतीने विद्यार्थ्यांसह भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली, असे मत मुख्याध्यापक जगत घुगे यांनी व्यक्त केले.



निसर्ग सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील झाडे, वनस्पती, पक्षी व नैसर्गिक घटकांचे निरीक्षण केले. पर्यावरणाचे महत्त्व, स्वच्छतेची गरज आणि निसर्गसंवर्धन याबाबत शिक्षकांनी मार्गदर्शन केले. खुल्या वातावरणात झालेल्या या शिकवणुकीमुळे मुलांमध्ये उत्साह आणि कुतूहल वाढले. याचवेळी विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना व व्यक्तिमत्त्व विकासाला वाव देण्यासाठी खेळ, समूह क्रिया आणि सादरीकरणांचे आयोजन करण्यात आले. गाणी, अभिनय, चित्रकला व संघभावनेवर आधारित खेळांतून विद्यार्थ्यांनी आपली कौशल्ये दाखवून आश्चर्याचा धक्का दिला. एका हातावर उडी, बिन हाताची उडी आदी कला बालकलाकारांनी खुप धाडसीने सादर केल्या. लघु नाटिका सादरीकरणाला प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. यासाठी शाळेतील परमेश्वर मोरे, वनिता आचार्य, गंगा टेपले, प्रज्ञा चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले. परिक्षेत्र भेटीमध्ये विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांच्या कार्यपद्धती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनापर्यंतचा प्रवास, यंत्रसामग्रीचा वापर, कामगारांचे शिस्तबद्ध कामकाज आणि सुरक्षिततेचे नियम यांची माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. पुस्तकातील ज्ञान प्रत्यक्षात कसे उतरते, हे मुलांना या भेटीतून स्पष्ट झाले. या संपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना नव्या माहितीचा ठेवा मिळाला, आत्मविश्वास वाढला आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व उत्साह हा या उपक्रमाच्या यशाचा खरा साक्षीदार ठरला. अशा उपक्रमांमुळे शिकण्याची आवड वाढते आणि भविष्यातील वाटचालीसाठी मुलांना सकारात्मक दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

# फक्त भावच नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पादनही वाढणार - सतीश घाटगे

## ‘समृद्धी’ च्या विभागीय कार्यालयाचे राणी उंचेगावमध्ये उदघाटन

**घनसावंगी । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी भाव देण्याबरोबरच येणाऱ्या काळात समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांचे उत्पादनही वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे, समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी सांगितले. रविवारी राणी उंचेगाव येथे समृद्धी साखर कारखान्याच्या विभागीय कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात ते बोलत होते. कारखान्याचे व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांच्या हस्ते हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन झाले. यावेळी परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेत- पानंद रस्त्याची सर्वात मोठी अडचण होती. समृद्धी कारखान्याने स्वखर्चातून दोनशे किमी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे रस्ते खुले करून दिले. शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात उच्चांकी भाव दिला. आता शेतकऱ्यांच्या समोर असेलल्या ऊस लागवडीचा, पत पुरवठा आणि खते आणि बियाणाचे प्रश्न सोडविण्यासाठी समृद्धी साखर प्रयत्न करणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त भाव देण्याबरोबर त्यांचे उत्पादनही वाढवणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले. समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांना ऊस लागवडीसाठी सुधारित जातीचे उसाचे बेणे , कंपोस्ट खताच्या पुरवठा करण्याबरोबर तज्ञामार्फत लागवडीचे योग्य मार्गदर्शन शेतकऱ्यांना करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी उसाचे पाचट न जाळता शेतातच कुजवण्याचे आवाहन केले. तसेच ऊस गाळपासाठी शेतकऱ्यांची स्पर्धा सुरु झाली आहे, उशिरा ऊस तुटल्यास नुकसान होईल, अशी भीती त्यांच्यात आहे. शेतकऱ्यांनी ऊस गाळपाची घाई करू नये. एकही शेतकऱ्यांचा ऊस गाळपाविना उभा राहणार नाही. असा शब्द सतीश घाटगे यांनी यावेळी दिला. समृद्धीच्या युनिट नंबर - २ चे काम प्रगतीपथावर असून लवकरच समृद्धी कारखान्याची गाळप क्षमता दुप्पटीने वाढणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त उसाचा प्रश्न कायमचा सुटेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**सीएसआर निधीतून जलसंधारण मोहीम हाती घेणार**

अनेक गावात पाणी अडवल्या जात नाही म्हणून पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न सोडविण्यासाठी शिरपूर पॅटर्न पद्धतीने १० कोटीची जलसंधारण मोहीम हाती घेण्याचा प्रयत्न समृद्धी साखर करणार आहे. त्यसाठी शेतकऱ्यांची साथ आवश्यक आहे. या मोहिमेतून ३० गावात सिमेंटचे बंधारे बांधण्याचा मानस असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले.

# सत्यशोधक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे १०० शिक्षक क्लब जालना सामान्य ज्ञानस्पर्धेत यश

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मानव विकास व पुर्नर्निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचालित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील विद्यार्थ्यांनी १०० शिक्षक क्लब जालना आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा २०२५ यामध्ये अक्षरा विलास फुके वर्ग १० वी, विकास चंद्रभान सनान्से, ओंकार कैलास सोरमारे, कृष्णा केशव मोहिते आणि मयुर कृष्णा जाधव वर्ग ९ वा या ५ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे. त्यांचा जालना येथे



सन्माननीय जेष्ठ विचारवंत एम. जोशी, १०० क्लब चे अध्यक्ष राजेभाऊ मगर, बालसिहत्यिक डॉ. विशाल तायडे, अधिव्याख्याता श्रीहरी दराडे व इतर मान्यवर यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान केला व विद्यालयातील शिक्षकांचे कौतुक केले .या विद्यार्थ्यांना इतिहासाची शिक्षिका श्रीमती सीमा लकडे , शिक्षक आनंद गरुड, दिनेश जाधव आणि पंजाब कांबळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनीलजी वाकेकर साहेब संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच श्री संदीप फुके, श्री निलेश कंकाळ यांचे सहकार्य लाभले. या यशाबद्दल विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



# योगेश कदम यांची उमेदवारी चर्चेत

## दांडगा जनसंपर्क, समाजकारणातून उभे राहिलेले नेतृत्व

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी आजपासून (दि. २३) सुरू झाली असली, तरी महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांमध्ये अद्याप जागावाटपाचा तोडगा न निघाल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. कोणाला उमेदवारी मिळणार, कोणाचा पत्ता कट होणार याबाबत अनिश्चितता असल्याने अनेक प्रभागांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत प्रभाग क्रमांक ८ मधून योगेश कदम यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तयारी सुरू केल्याने राजकीय चर्चांना वेग आला आहे.

प्रभाग क्रमांक ८ मध्ये योगेश कदम यांचा दांडगा जनसंपर्क असून, सर्व समाजघटकांमध्ये त्यांची ओळख एक कार्यशील, लोकाभिमुख आणि सामाजिक बांधिलकी जपणारा नेता अशी आहे. राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व देणाऱ्या कदम यांनी गेल्या अनेक वर्षांत प्रभागातील नागरिकांशी थेट संवाद साधत विविध उपक्रम राबवले आहेत. त्यामुळे केवळ पक्षीय कार्यकर्ता नव्हे, तर सर्वसामान्यांचा विश्वासू चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

योगेश कदम यांनी रक्तदान शिबिरे, युवकांसाठी बॉडीबिल्डींग स्पर्धा, सामाजिक जागृतीचे कार्यक्रम अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त केले आहे. आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक एकोप्याला चालना देणाऱ्या त्यांच्या कामामुळे प्रभागातील तरुणाईमध्ये त्यांचा प्रभाव वाढत गेला. विशेष म्हणजे, या उपक्रमांमध्ये त्यांनी कोणताही राजकीय स्वार्थ न ठेवता निस्वार्थ सेवाभाव दाखवला, हे नागरिकांकडून आवर्जून नमूद केले जाते.

कोरोना महामारीच्या कठीण काळात जेव्हा अनेकजण घराबाहेर पडण्यास घाबरत होते, त्या वेळी योगेश कदम यांनी स्वयंस्फूर्तीने नागरिकांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. गरजू कुटुंबांना अन्नधान्य, औषधे, मास्क यांचे वितरण, तसेच प्रशासनाशी समन्वय साधून नागरिकांना मदत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. या काळात त्यांनी दाखवलेली संवेदनशीलता आणि धाडस आजही नागरिकांच्या स्मरणात आहे. केवळ प्रभागापुरतेच मर्यादीत न राहता योगेश कदम यांनी शहरासह तालुकाभरात त्यांच्या कार्याने वेगळे वलय निर्माण केले आहे.

योगेश कदम हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे जालना तालुकाध्यक्ष आहेत.



संघटनात्मक पातळीवर त्यांनी पक्ष मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले असून, तळागाळातील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधण्याची त्यांची शैली कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरली आहे. पक्षातील शिस्त, स्पष्ट भूमिका आणि आक्रमक पण मुद्देसूद मांडणी ही त्यांची ओळख आहे.

प्रभाग क्रमांक ८ मधील अनेक नागरिकांच्या मते, विकासाबरोबरच माणुसकी जपणारा नगरसेवक म्हणून योगेश कदम यांच्याकडून अपेक्षा आहेत. रस्ते, पाणी, स्वच्छता, युवकांसाठी सुविधा, तसेच सामाजिक प्रश्नांवर थेट हस्तक्षेप करणारा प्रतिनिधी म्हणून ते सक्षम उमेदवार मानले जात आहेत.

एकंदरीत, जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ मधून योगेश कदम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यास, ती केवळ एक राजकीय उमेदवारी न राहता समाजकारणातून उभ्या राहिलेल्या नेतृत्वाची चाचणी ठरेल, अशी चर्चा सध्या शहरात रंगू लागली आहे.

---

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५

## नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

**जालना । प्रतिनिधी -** राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. जालना शहर महानगरपालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या कार्यकर्ते व हितचिंतकाने, मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे. नमुना मतपत्रिकेसाठी मा.निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे. मा.निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध आदर्श आचारसंहिता संपेपर्यंत घालण्यात आले आहेत, असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

---

## धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध

**जालना । प्रतिनिधी -** राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. जालना शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये/संस्था, शासकीय विश्राम गृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

---

## वैद्य वडगांव प्रकरणी जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांवर तात्काळ कारवाईची मागणी

वंचित बहुजन आघाडीचा सेवली पोलीस ठाण्यावर मोर्चा



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील वैद्य वडगांव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात जातीय तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने अज्ञात समाजकंटकांनी अनधिकृत ध्वज लावल्याची घटना घडून तब्बल १८ ते १९ दिवस उलटले असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या पार्श्वभूमीवर संबंधित समाजकंटकांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सेवली (ता. जालना) पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला.

हा मोर्चा वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला. यावेळी पोलीस प्रशासनाला निवेदन देऊन वैद्य वडगांव येथील अज्ञात समाजकंटकांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.

मोर्चामध्ये गौतम मगर, दिलीप मगर, बाबासाहेब मगर, संदीप मगर, माणिकराव मगर, दिलीप दत्तराव मगर, विश्वनाथ मगर, योगेश उघडे, रमेश उघडे, शरद मगर, कृष्णा मगर, प्रकाश सदर, बबन मगर, गुलाब मगर, अशोक मगर, गणेश खरात, दत्ता खाडे, मुकुंद काळे, एकनाथ डोके, समाधान डोके, सम्यक डोके, मदन डोके, त्रिरत्न डोके, किरण डोके, रमेश डोके, मिलिंद डोके, आशीष मोरे, सुमेध मोरे, प्रल्हाद पालवे, शत्रुघ्न कोळी, प्रसाद सदावर्ते यांच्यासह शेकडो महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या घटनेमुळे परिसरातील सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असून, पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

---

जालन्यात भाजप कार्यालयावर भाजप पदाधिकाऱ्यांचा फटाके फोडून जल्लोष

## जालना जिल्ह्यात तीनपैकी दोन नगर परिषदांवर भाजपचा झेंडा; राज्यातही घवघवीत यश

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायत निवडणुकांच्या निकालात भाजपला मिळालेल्या दणदणीत यशाबद्दल जालन्यात भाजप पदाधिकाऱ्यांनी जल्लोष साजरा केला.

जालन्यात नगर परिषद निवडणुकांच्या निकालात जालना जिल्ह्यात तीनपैकी दोन नगर परिषदांवर भाजपला घवघवीत यश मिळाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर जालना शहरातील संभाजीनगर परिसरात असलेल्या भाजप कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायत निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले. या निवडणुकांमध्ये भाजपला



मोठे यश मिळाले असून तब्बल १२० ठिकाणी भाजप विजयी झाला आहे. तर एकूण २१५ जागांवर महायुतीने विजय मिळवला आहे. या पार्श्वभूमीवर जालना येथील भाजप कार्यालयासमोर भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके फोडत आनंद व्यक्त केला. यावेळी भाजपच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली, ज्यामुळे परिसर दणाणून गेला होता. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

निकाल जाहीर होताच भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने कार्यालयासमोर एकत्र जमले. ढोल-ताशांच्या गजरात फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला. तसेच एकमेकांना पेढे भरवून विजयाचा आनंद साजरा करण्यात आला.

भाजप कार्यालयासमोर कार्यकर्त्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

राज्यातही बहुसंख्य ठिकाणी भाजपला यश मिळाल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाल्याचे पाहायला मिळाले. या विजयाला जनतेने विकास, पारदर्शक प्रशासन आणि स्थिर नेतृत्वाला दिलेली पसंती असल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आगामी काळात नगर परिषदांमधून अधिक प्रभावीपणे विकासकामे मार्गी लावण्यात येतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५

## शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, विश्रामगृह परिसरात मिरवणूका काढणे, घोषणा देण्यास निर्बंध

**जालना । प्रतिनिधी -** राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. त्यानुसार जालना शहरातील महापालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्ह्यातील महापालिका क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहांच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे, रॅली काढणे, निवडणूकी संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटींग, होर्डीग्ज इत्यादी लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहीणे, किंवा सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इत्यादीबाबी नियंत्रीत करणे आवश्यक आहे. ज्या अर्थी सर्व संबंधीतांना नोटीस देवून त्यांचे म्हणने ऐकून घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये उक्त ठिकाणी आदर्श आचारसंहिता संपेपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत, असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

---

## विप्र फाउंडेशन स्थापना दिनानिमित्त महाआरतीचा भक्तिभावपूर्ण सोहळा

**जालना । प्रतिनिधी -** विप्र फाउंडेशन शाखा जालनाच्यावतीने फाउंडेशनच्या स्थापना दिनानिमित्त जालना शहरातील बडी सडकवरील श्रीराम मंदिरात भगवान परशुराम यांची महाआरती करण्यात आली.

विप्र फाउंडेशनच्या स्थापनेला १६ वर्षे पूर्ण होऊन संस्था १७ व्या वर्षात पदार्पण करत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून महाआरती करण्यात आली. समाजातील सर्व स्तरांतील विप्र बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक व सामाजिक सोहळ्यात सहभाग नोंदवला. संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता. यावेळी अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली यांनी विप्र फाउंडेशनच्या कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले की, विप्र फाउंडेशन ही केवळ एक संस्था नसून ती समाजातील



मूल्य, संस्कार आणि सेवा यांची चळवळ आहे. मागील १६ वर्षांमध्ये फाउंडेशनने समाजसेवा, शिक्षण, सांस्कृतिक जतन आणि युवक घडणीसाठी सातत्याने कार्य केले आहे. भगवान परशुराम यांचे शौर्य, न्याय आणि सत्य हे आदर्श आमच्या कार्याचे मार्गदर्शक तत्त्व आहेत. १७ व्या वर्षात पदार्पण करताना समाजासाठी अधिक व्यापक, संघटित आणि परिणामकारक काम करण्याचा आम्ही संकल्प घेत आहोत. यावेळी त्यांनी समाजातील युवकांनी संघटित होऊन सामाजिक जबाबदारी स्वीकारावी, शिक्षण व संस्कार यांना प्राधान्य द्यावे आणि विप्र फाउंडेशनच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमाला विप्र फाउंडेशनचे शाखा जालनाचे सचिव पं. विजय व्यास, पवन जोशी, विनोद दायमा, रविंद्र दायमा, सुरेश पारीक, हितेश जोशी, चंद्रप्रकाश श्रीमाली, सुनील गौड, अमित शर्मा (सिंगापूर), गौरव गौड, विनायक रावते, दीपक सारस्वत आदींसह अनेक विप्र बांधव उपस्थित होते. महाआरतीनंतर उपस्थितांनी एकमेकांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा समारोप सामाजिक ऐक्य, परंपरा आणि सेवा भावनेचा संदेश देत झाला.

---

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५

## उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करावयाची कार्यपध्दती जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये शक्तीचा वापर करुन निवडणूकीचे कालावधीत जालना शहरातील महापालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी त्यांच्या वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या/वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. तसेच उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मीटर परिसरात तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचे अवारात फक्त उमेदवार, सूचक/अनूमोदक अथवा दोन व्यक्ती यांना परवानगी दिली जाईल. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंध करण्यात आला आहे. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.